निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २२६ वा.
रविवार :१९ ऑक्टोबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप नाही, शरद पवार थेट उतरले मैदानात!



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्य सरकारनं शेतक-यांना केलेल्या मदतीनंतर पवारांच्या राष्ट्रवादीनं आक्रमक पवित्रा घेतलाय. राज्यभर पवारांच्या राष्ट्रवादीनं आंदोलन करत काळी दिवाळी साजरा केलीय. ओला दुष्काळ जाहीर करावा तसंच कर्जमाफी करण्यात यावी अशी मागणी यावेळी आंदोलकांनी केलीय. तसंच शेतक-यांना सरकारनं मोकळ्या हातानं मदत केली नसल्याचं म्हणत शरद पवारांनी देखील सरकारवर हल्लाबोल केलाय.शरद पवारांच्या राष्ट्रवादी सरकारविरोधात आक्रमक झालीय, सरकारनं शेतक-यांना दिवाळीपर्यंत मदतीचं आश्वासन दिलंय, मात्र शेतक-यांच्या खात्यात अद्यापही मदत जमा न झाल्यामुळे पवारांची राष्ट्रवादी थेट मैदानात उतरलीय. अतिवृष्टीमुळे शेतकरी उद्धस्त झाल्यानं दिवाळी साजरा न करण्याचा निर्णय शरद पवारांच्या राष्ट्रवादीनं घेतलाय. एवढंच नव्हे तर आज पवारांच्या राष्ट्रवादीकडून राज्यभर काळी दिवाळी साजरी करण्यात येतीय.

सप्टेंबरमध्ये झालेल्या मुसळधार पावसानं शेतक-यांचा पिकांचा चिखल झाला, पावसाच्या पाण्यात पिकं सडून गेलीत, त्यामुळे शेतक-यांच्या हातात काहीही लागलं नाही. सरकारनं शेतक-यांसाठी विशेष पॅकेजचीही घोषणा केली. मात्र, सरकारच्या मदतीवरून पवारांनी सरकारला थेट


सवाल केलाय. शेतक-यांना मोकळ्या हातानं मदत केली नसल्याचं म्हणत पवारांनी सरकारवर हल्लाबोल केला.पवारांच्या राष्ट्रवादीच्या आंदोलनाला त्यांच्या सहकारी पक्षानं देखील पाठिंबा दिलाय. काँग्रेसच्या विजय वडेट्टीवारांनीही शेतक-यांच्या मदतीवरून सरकारवर निशाणा साधलाय. तर विरोधकांच्या टीकेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी जोरदार प्रत्युत्तर दिलंय..

मुंबईच्या वांद्रेत पवारांच्या राष्ट्रवादीकडून आंदोलन करण्यात आलं. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काळ्या रंगाचे आकाश कंदील हातात घेऊन सरकारचा निषेध करण्यात आला.पुण्यातही राष्ट्रवादीनं जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. ओला दुष्काळ जाहीर न केल्यास मंत्र्यांच्या घरासमोर आंदोलनाचा इशारा यावेळी पवारांच्या राष्ट्रवादीनं दिलाय.सांगलीमध्ये देखील आंदोलन करत ओला दुष्काळ आणि शेतक-यांची कर्जमाफी करण्याची मागणी करण्यात आलीय.

अतिवृष्टीमुळे होत्याचं नव्हतं झालं, शेतकरी हतबल झालाय. त्याला आधाराची गरज आहे. सरकारनं देखील शेतक-यांना धीर देण्यासाठी पुन्हा नव्या उमेदीनं उभं करण्यासाठी मदतीची घोषणा केली. मात्र, शेतक-यांना अद्यापही मदत मिळालेली नाही, तसंच सरकारनं केलेली मदत ही तुटपुंजी असल्याचं म्हणत पवारांच्या राष्ट्रवादीनं राज्यभर आक्रमक पवित्रा घेतलाय.

### शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने काळी दिवाळी का साजरी केली?

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक खराब झाले आणि महायुती सरकारने मदत वेळेवर दिली नाही, असे आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ने १७ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्यभर काळी दिवाळी साजरी केली. शेतकऱ्यांच्या न्यायासाठी निषेध आंदोलन केले गेले, ज्यात ओला दुष्काळ जाहीर करणे आणि सरसकट कर्जमाफीची मागणी करण्यात आली. शरद पवारांनी सरकारला 'फसवी मदत' देण्याचा आरोप केला.




## बुलढाण्याचा कंत्राटदार, आमदाराकडे आली कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**बुलढाणा (प्रतिनिधी)** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपूर्वीच बुलढाण्यात महायुतीत मिठाचा खडा पडल्याचं चित्र आहे. भाजप आणि शिवसेना आमने-सामने आलीये. भाजप जिल्हाध्यक्षाने आमदार संजय गायकवाडांवर काही आरोप केलेत. या वादाचं कारण ठरलीये दीड कोटींची डिफेंडर कार. तेव्हा नेमकं प्रकरण काय आहे याबद्दल जाणून घेऊयात. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपूर्वीच बुलढाण्यात महायुतीतील २ घटक पक्ष आमने-सामने आलेत. भाजप आणि शिवसेनेमध्ये जुंपल्याचं पहायला मिळतंय. एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात आता आरोपांच्या फैरी झाडू लागल्यात. सध्या बुलढाण्यात दीड कोटींच्या डिफेंडरची चांगलीच चर्चा सुरू आहे. नुकताच संजय गायकवाड यांचा डिफेंडर गाडीसोबतचा एक व्हिडिओ समोर आलाय. ती एका ठेकेदाराच्या नावे असून कमिशनच्या स्वरुपात मिळाल्याचा दावा भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदेंनी केलाय. आगामी निवडणुकांमध्ये बुलढाण्यात युती करायची की नाही यावरून भाजप आणि शिवसेना आमने-सामने आलीये.त्यावरूनच आता आरोप सुरु झालेत.कही दिवसांपूर्वीच संजय गायकवाडांनी मराठवाड्यातील शेतक-यांना २५ लाख देण्यासाठी आपले २ प्लॉट विकल्याचं समोर आलं होतं.



त्यामुळे आता दीड कोटीची गाडी कुठून आली असा प्रश्न भाजपने विचारलाय. त्यावर संजय गायकवाडांनी स्पष्टीकरण दिलंय. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवेंनी दीड कोटींच्या डिफेंडरवरून महायुतीतील इतरही नेत्यांच्या महागड्या गाड्यांचा मुद्दा समोर आणलाय. दीड कोटींची डिफेंडर आपली नसल्याचं स्पष्टीकरण संजय गायकवाडांनी दिलंय. मात्र ऐन निवडणुकांच्या तोंडावर महायुतीतील मित्र पक्षानेच हाच मुद्दा उखरून काढल्यानंतर बुलढाण्यात युतीत फूट पडतेय की काय अशी चर्चा सुरू झालीये.

## महाएल्गार मेळाव्यात छगन भुजबळांचा ओबीसींचे प्रमुख नेते म्हणून घोषित

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** बीडमध्ये ओबीसी समाजानं महाएल्गार मेळाव्याचं आयोजन केलं होतं. या मेळाव्यात काही नेत्यांनी जाहीरपणे छगन भुजबळांना ओबीसींचे प्रमुख नेते म्हणून घोषित केलंय. त्यामुळे भविष्यातील ओबीसीच्या लढ्याचं नेतृत्व छगन भुजबळच करणार यावर शिक्कामोर्तब झाल्याचं बोललं जातंय.बीडच्या सभेतील धनंजय मुंडे यांचं हे वाक्य येणाऱ्या ओबीसी आरक्षणाच्या लढाईत कोण सारथ्य करणार हे सांगण्यास पुरेसं आहे. भुजबळ हेच आता ओबीसींचे मोठे नेते असल्याचं धनंजय मुंडेंनी म्हटलंय आणि इथून पुढे लढ्याची सूत्र त्यांच्याच हातात असतील जणू असा एक इशाराच त्यांनी दिलाय.

जरांगेंनी मराठा आरक्षणाची लढाई सुरू केल्यानंतर सर्वात आधी छगन भुजबळांनाच टार्गेट केलं होतं. त्यानंतर गेली दीड वर्ष राज्यात भुजबळ विरुद्ध जरांगे असा सामना सुरू आहे.ओबीसींची एकजूट होऊ शकत नाही असा दावा अनेकदा केला जात होता. मात्र आता महाएल्गार मेळाव्यातून धनंजय मुंडेंसह गोपीचंद पडळकरांनी भुजबळांचं नेतृत्वच मान्य केलंय.

याबाबत लक्ष्मण हाके यांनीही आपली भूमिका स्पष्ट केलीय.छगन भुजबळ हे ओबीसींचे नेते आहेतच.

मात्र ओबीसींच्या न्याय हक्कांसाठी जो लढणार तो प्रत्येक जण ओबीसींचा नेता होईल हे सांगायलाही लक्ष्मण हाके विसरले नाहीत. तर मनोज जरांगे यांनीही भुजबळांवर हल्लाबोल केलाय. भुजबळांचा जामीन गृह मंत्रालयानं रद्द करावा ते दहशत पसरवत आहेत, असा घणाघात मनोज जरांगेंनी केलाय. एकीकडं आता ओबीसी नेत्यांमध्येच ओबीसी विरुद्ध मराठा या लढ्याच्या माध्यमातून वाद लागल्याचं चित्र आहे. तर दुसरीकडे काही नेते मात्र भुजबळांना समोर करून आता लढ्याचं सारथ्य त्यांच्या हातात देताना दिसतायत. छगन भुजबळांच्या नावावर सर्वच ओबीसी नेत्यांचं एकमत होणार का, याकडे आता लक्ष लागलंय.

बीडमध्ये ओबीसी समाजाने महाएल्गार मेळाव्याचं आयोजन केलं. या मेळाव्यात काही नेत्यांनी जाहीरपणे छगन भुजबळांना ओबीसींचे प्रमुख नेते म्हणून घोषित केले.

यामुळे भविष्यातील ओबीसी आरक्षणाच्या लढ्याचं नेतृत्व भुजबळच करणार, यावर शिक्कामोर्तब झाल्याचं बोललं जात आहे.जरांगेंनी मराठा आरक्षणाची लढाई सुरू केल्यानंतर सर्वात आधी छगन भुजबळांनाच टार्गेट केलं. गेल्या दीड वर्षांपासून राज्यात भुजबळ विरुद्ध जरांगे असा सामना सुरू आहे. यापूर्वी ओबीसींची एकजूट होऊ शकत नाही असा दावा केला जात होता, पण आता मेळाव्यातून एकजूट दिसली.

### धनंजय मुंडे यांनी छगन भुजबळांबाबत काय म्हटले?

धनंजय मुंडे यांनी म्हटले की, भुजबळ हे आता ओबीसींचे मोठे नेते असून, येणाऱ्या ओबीसी आरक्षणाच्या लढाईत ते सारथ्य करतील. इथून पुढे लढ्याची सूत्रे भुजबळांच्या हातात असतील, असा इशारा त्यांनी दिला. गोपीचंद पडळकर यांनीही भुजबळांचं नेतृत्व मान्य केलं आहे.




## राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिल्या दिवाळीच्या शुभेच्छा

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिवाळीनिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.दिवाळीचा सण अंधकारावर प्रकाशाचा, अन्यायावर न्यायाचा आणि नकारात्मकतेवर सकारात्मकतेच्या विजयाचे प्रतीक आहे.या निमित्त सर्वांना स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार करण्याचे आवाहन करतो. पर्यावरण रक्षण, नैसर्गिक संसाधनांचा आदर आणि नैसर्गिक शेती यासारख्या शाश्वत जीवन मूल्यांचा अवलंब करून उज्ज्वल, समृद्ध आणि स्वावलंबी भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे, असे आवाहन करतो. ही दिवाळी सर्वांच्या जीवनात आनंद, शांती, आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवो या शुभेच्छा देतो,असे राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

## जालन्यातील लाचखोर आयुक्ताचा तुरुंगातील मुक्काम वाढला

### कोर्टाचा दणका, जामीन फेटाळला

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** महापालिका आयुक्तांना चक्क १० लाख रुपयांची लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आल्याने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. आता, जालन्यातील महानगरपालिकेचे लाचखोर आयुक्त संतोष खांडेकर याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली असून न्यायालयाकडे जामीनासाठी केलेला अर्ज कोर्टाने फेटाळून लावला आहे. त्यामुळे, जालना महापालिका आयुक्त महोदयांचा कोठडीतील मुक्काम आणखी वाढला आहे. एका कंत्राटदाराकडून १० लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी महपालिका आयुक्तांना एसीबीने अटक केली होती. त्यानंतर, त्यांना न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आले होते.

दोन दिवसापूर्वी कंत्राटदाराकडून १० लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी जालना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडून आयुक्त खांडेकरला अटक केली होती. या प्रकरणी आरोपी खांडेकरला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती, आज अंबड येथील सत्र न्यायालयाने खांडेकरची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली. दरम्यान, आयुक्त महाशयांनी तात्काळ आपला जामीनासाठी अर्ज केला होता. मात्र, अंबड न्यायालयाने आरोपी लाचखोर आयुक्तांचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे.

महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर लाचेच्या जाळ्यात अडकले आहेत. तक्रारदाराकडून कामाचे बिल पास करण्यासाठी तब्बल १० लाख रुपयांची लाच देण्याची मागणी खांडेकर यांनी केली होती. यावेळी शासकीय निवासस्थानी १० लाखांची लाच स्वीकारताना रंगेहाथ त्यांना पकडले होते. जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं ही कारवाई केली. संतोष खांडेकर यांच्या घराची देखील झाडाझडती घेण्यात आली आहे. या घटनेनं जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली होती.

### आयुक्तांना अटक होताच फोडले फटाके

जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांच्या अटकेनंतर जालन्यात कंत्राटदारांनी जालना एसीबी कार्यालयाबाहेर फटाके फोडून आपला रोष व्यक्त केला. जालना महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर यांनी बांधकामाचे बिल देण्यासाठी तक्रारदाराकडून दहा लाखाची लाच मागितली होती, यावेळी जालना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने खांडेकर यांच्या शासकीय निवासस्थानी सापळा रचून ही लाच स्वीकारताना त्यांना रंगेहात अटक केलं. यानंतर काही कंत्राटदारांनी एसीबी कार्यालयासमोर फटाके फोडून आपला रोष व्यक्त केला, तसेच एसीबी अधिकाऱ्यांचे आभार मानले.



# दिवाळी अंक म्हणजे पर्वणीच!

**आपल्या देशात दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. आताही देशात दिवाळीची धामधूम सुरु आहे. वेगवेगळ्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या आहेत. सर्वत्र दिवाळीच्या खरेदीची धामधून सुरु आहे. आकाशकंदील, मिठाई, फटाके, नवीन कपडे, नवीन वाहने, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्या खरेदीसाठी दुकाने फुलून गेली आहेत. दिवाळीमुळे सर्वांच्या उत्साहाला उधाण आले आहे. दिवाळी म्हंटले की गोडाआधोडाचा फराळ, आकाशकंदील, पणत्या, नवीन कपडे, नवीन वस्तू असे जे समीकरण आहे तसेच दिवाळी म्हणजे दिवाळी अंक असेही समीकरण आहे.**

**दिवाळी आली की वाचकांना वेध लागतात ते दिवाळी अंकाचे आणि वाचकांचे पाय आपसूकच दिवाळी अंकाच्या खरेदीसाठी पुस्तकांच्या दुकानाकडे वळतात. महाराष्ट्रात तर दिवाळी अंकाची परंपरा खूप पूर्वीपासून आहे. महाराष्ट्रात पहिला दिवाळी अंक १९०९ साली प्रसिद्ध झाला होता. त्याचे नाव मनोरंजन असे होते. पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध होऊन आज ११६ वर्ष झाली आहेत. आपल्या राज्यात दरवर्षी विविध विषयांवरील दर्जेदार दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. महाराष्ट्रात जवळपास हजाराच्या आसपास दिवाळी अंक प्रकाशित होतात. दरवर्षी त्यात नव्या अंकाची भर पडतेच. दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी मेजवानीच. कला, क्रीडा, साहित्य, राजकारण, अर्थकारण, विनोद, कथा, कादंबरी, कविता, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आहार, व्यंगचित्र, भविष्य, चित्रपट, नाटक अशा विविध विषयांवरील दिवाळी अंक वाचणे म्हणजे पर्वणीच. अनेक वृत्तपत्रे आपल्या वाचकांसाठी दिवाळी अंक काढत असतात. यावर्षीही अनेक वृत्तपत्रांनी आपल्या वाचकांसाठी दिवाळी अंक काढले आहेत. फटाके, मिठाई, फराळ यासोबतच दिवाळी अंक ही सुशिक्षित आणि साहित्यप्रेमी घरांसाठी एक आवश्यक घटक आहे.**

**मधल्या काळात दिवाळी अंकांना घरघर लागली होती. कोरोना काळात दिवाळी अंकाच्या छपाई आणि वितरणाला मर्यादा आल्या होत्या. त्यामुळे तुलनेने कमी दिवाळी अंक प्रसिद्ध झाले होते. असे असली तरी काही संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले अंक ऑनलाईन प्रसिद्ध केले होते. वाचकांना ते डिजिटल प्लॅटफॉर्म वर उपलब्ध झाले होते. काहींनी आपले अंक पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करुन दिले होते. वाचकांनी त्याची प्रिंट काढून ते वाचले होते.**

**कोरोनाचे दुष्चक्र संपल्यानंतर दिवाळी अंकांना पुन्हा सुगीचे दिवस आले. यावर्षी अनेक संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले दिवाळी अंक वाचकांसाठी उपलब्ध करुन दिले आहेत. काहींनी ऑडिओ आणि व्हिज्युअल दिवाळी अंकही बाजारात आणले आहेत. वाचक पूर्वीच्याच उत्साहाने दिवाळी अंकाचे स्वागत करीत आहे.**

**दिवाळी अंक आपल्या साहित्य संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. दिवाळी अंकामुळे वाचन संस्कृती रुजायला खूप मदत झाली आहे. वाचन संस्कृती रुजवण्यात आणि नव्या पिढीला वाचन संस्कृतीकडे घेऊन जाण्यात दिवाळी अंकांचा मोलाचा वाटा आहे. यावर्षी आपण आपल्या नातेवाईकांना आणि मित्र परिवाराला दिवाळीच्या शुभेच्छा आणि फराळासोबत दर्जेदार दिवाळी अंक भेट द्यावीत. वाचनाची गोडी वाढवण्यासाठी दिवाळी अंक हा चांगला मार्ग आहे. गोडाधोडाच्या फराळासोबतच वाचनाचा हा फराळही दिला तर दिवाळीची गोडी आणखी वाढेल आणि वाचन संस्कृती टिकायलाही मदत होईल.**

# दिवाळी हा सण सर्वांचाच?

दिवाळी ही सर्वांचीच आहे. परंतु दिवाळी हा सण हिंदूंचा असे समजून सर्वच धर्मीय दिवाळी साजरी करतांना निरसता दाखवतात. बौद्ध मंडळी या दिवशी मोगलायन व सारिपुत्तची हत्या झाली असा दाखला देवून दिवाळी हा काळा दिवस मानतात तर मुस्लीम लोकं अल्ला एकच आहे व तो या दिवशी जन्मला नाही असं कारण देत दिवाळी साजरा करणे टाळतात. ख्रिश्चन मंडळी येशू ख्रिस्ताच्या मृत्यूच्या तिथीला दिवाळी मानतात. तसं पाहिल्यास प्रत्येक धर्मातच दिवाळी आहे. दिवाळीचा अर्थच आनंद असा होतो. परंतु प्रत्येक धर्मात तिथ्या वेगवेगळ्या आहेत. शिवाय ही तिथीही हिंदू धर्मियांची नसेलच. कारण त्यांची तिथी वेगळी होती व ही तिथी शेतकऱ्यांची तिथी होती. म्हणूनच हा दिवस सर्व धर्मियांनी साजरा करण्यालायक तिथी आहे. ज्या ज्या धर्मात शेतकरी आहेत. हा केवळ हिंदूंचाच सण नाही. तो सर्व धर्मियांचाच सण आहे. जो अखंड हिंदुस्थानात राहात असेल.

दिवाळी हा सण नेमका कोणाचा. असा प्रश्न कुणालाही आज पडणार नाही. कारण आपल्या मनावर दिवाळी हा हिंदूंचा सण आहे, हेच कोरलं गेलेलं आहे आणि तो सण हिंदू धर्मीयच साजरा करतांना आपल्याला दिसत आहे. तो सण हिंदू धर्मीयच साजरा करीत आलेले आहेत आजतागायत. त्यामुळंच नेमका हा सण कोणाचा? याबाबतचा विचारच आपण कधी केलेला नाही.अलिकडे दिवाळी हा सण साजरा होतोय आणि तो सण अगदी धुमधडाक्यात साजरा करण्याची एक प्रथा आहे. या दिवशी सर्व घरोघरी नंदादीप लावले जातात. घरासमोर रांगोळ्या काढल्या जातात. त्यानंतर फटाकेही फोडले जातात. परंतु हा सण नेमका कोणाचा आणि तो केव्हापासून अस्तित्वात आला असेल याचा विचारही केला जात नाही.

दिवाळी हा सण नेमका कोणाचा? असा प्रश्न उपस्थित केल्यास आतिशयोक्ती होईल. कारण या सणावर दावे प्रतिदावे नेहमीच चालत असतात. कधी या सणावर हिंदू धर्मीय दावे करतात. त्यासाठी इतिहास सांगतात तर कधी या सणावर बौद्ध धम्मीय लोकं दावे करतात व तेही हक्कं सांगत असतात. त्यामागे त्यांचा त्यांचा इतिहास आहे. हिंदूंचा इतिहास असा आहे की राम वनवासातून परत आले. ते परत आल्याने त्या दिवशी दिवाळी साजरी केली होती. म्हणूनच हा दिवाळी सण हिंदूंचा. परंतु यावर काही बौद्ध धर्मीय म्हणतात की राम हे वनवासातून वैशाख महिन्यात परत आले. त्यामुळंच हा सण त्यांचा नाही. तो सण आमचा आहे. कारण आमचे भदंत पावसाळ्याच्या आजारांचे प्रमाण जास्त असल्यानं स्वतःला तीन महिनेपर्यंत गृहेत वा लेणीत स्वतःला बंदिस्त करुन ठेवत. आजार त्यांना शिवू नये म्हणून. त्यात ते उपास तापासही ठेवत नव्हे तर त्या वर्षावासाच्या काळात सतत पाऊस पडत असल्यानं व अन्न मिळविण्यासाठी पुरेशी सोय नसल्यानं उपास तापासही घडत. त्यातच चार महिने पावसाळा असायचा. त्यानंतर वाऱ्याची दिशा बदलायची व परतीचा पाऊस सुरु व्हायचा. त्याचा अंदाज बौद्ध भिख्खूंना यायचा. त्यातच असा अंदाज आलाच की ते विशिष्ट अशी तिथी पाहून बाहेर पडत. ते ज्या दिवशी बाहेर पडत. त्याच्या आधीच्या दिवशी तीच मंडळी एक प्रकारचा मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा करीत असत. त्याला दिवाळी असे म्हणत. त्यानंतर ते धम्म प्रसारासाठी बाहेर पडत व तो उत्सव कोजागिरी पौर्णीमेला साजरा होत असे. ही त्यांची दिवाळीच असे.

हिंदू मात्र खऱ्या अर्थानं दिवाळी गुढी पाडव्यालाच साजरी करायचे. त्या दिवशी ते गुढी उभारायचे. त्याचं कारण होतं, हिंदू धर्माचं पित्तरांना मानणं. ते पित्तरं निराश होवू नये म्हणून गुढी उभारली जायची व तो सण अतिभव्य प्रमाणात हिंदू धर्मीय साजरे करीत असत. त्याला गालबोट लागलं संभाजी महाराजांच्या हत्येनं. मुघलांनी पाहिलं की हिंदू लोकं गुढीपाडवा जोमानं साजरा करतात. तेव्हा हा सण त्यांनी साजरा करु नये म्हणून त्यांनी संभाजी महाराजांची त्याच दिवशी रात्रीला हत्या केली व त्यांचं मस्तक त्याच दिवशी गुढी रुपात भाल्यावर सजवलं व हिंदूंचा दिवाळी म्हणून साजरा होणारा सण नष्ट केला.

दिवाळी ही हिंदूचीही साजरी होत असे व दिवाळी ही बौद्धांचीही साजरी होत असे. मात्र त्यांच्या तिथ्या वेगवेगळ्या होत्या. मग हीच दिवाळीची तिथी हिंदूंनी का घेतली असेल यामागे कारणमिमांसा आहे व हा सण नेमका कोणाचा? हे सुद्धा आज अज्ञात स्वरुपात आहे आणि विचार करणारा प्रश्न आहे.

या सणाबाबत सांगायचं झाल्यास हा सण तसं पाहिल्यास व सखोल विचार केल्यास शेतकऱ्यांचा आढळून येतो. माणूस झाडावरुन जेव्हा खाली आला आणि तो शेती करु लागला हे सर्वांनाच माहीत आहे व ही गोष्ट डार्वीनचा उत्क्रांतीवाद सांगतोच. त्यातच त्याहीवेळेस भारताला भारत जरी नाव नसलं तरी भारत असेलच ही शक्यताही नाकारता येत नाही. तसं पाहिल्यास दिवाळी हा सण आपल्याच भारतात आणि त्यावेळच्या हिंदुस्थानात साजरा होत असेलच. ज्या अखंड हिंदुस्थानात सर्वदूर हिंदू धर्म किंवा बौद्ध धर्म नसेलच. मग कोणाचं राज्य असेल बरे? ते राज्य होतं शेतकरी वर्गाचं.

हीच तिथी का?

ज्यावेळेस भारत अस्तित्वातही नव्हता आणि ज्यावेळेस धर्महीं अस्तित्वात नव्हता. त्यावेळेसही हा सण साजरा होत असे. अन् तो त्या काळानुसार साजरा केल्या जात असे. मग हीच तिथी तो सण साजरा करण्याची होती काय? असाही एक प्रश्न आपणाला पडू शकतो. तर याचं उत्तर होय असंच येईल. यापुर्वीच्या चार महिन्याच्या काळात भारतात म्हणजेच अखंड हिंदुस्थानात जुन ते सप्टेंबर पावसाळा असायचा. सतत पाऊस पडायचा. ज्यात अतिवृष्टीनं शेतकऱ्यांचं अतोनात नुकसानही व्हायचं. तरीही काही माल शेतात उरायचंच. त्यातच पाऊस संपला की शेतकरी वर्ग ते धान्य कापायचे व त्याला मार्गी लावून धान्य काढायचे. त्यातील राशी घरी भरल्या जात असत. अशातच त्या राशी घरात भरल्या गेल्या की एक दिवस निवडायचे. त्या दिवशी त्या राशीच्या सन्मानार्थ नाचगाणे करायचे. पर्यायानं सांगायचं झाल्यास उत्सव साजरा करायचे. ज्यात उत्सव साजरा करतांना त्यात घराची साफसफाई करायचे. त्यात उद्देश होता. घरात जे जीवजंतू आहेत. ते बाहेर पडायला हवेत. ज्यापासून धान्याला नुकसान आहे. पुढं चुनखडकाचा शोध लागल्यानंतर चुना मारण्याची पद्धत रुढ झाली. ज्यात चुना मारल्यावर धान्याला किड्यापासून व मुंग्यांपासून वाचवता येत असे.

हा मुळचा शेतकऱ्यांचा सण. दिवाळी आणि होळी हे दोन्ही सणं शेतकऱ्यांचेच. पहिला सण खरीप पिके घरी आणल्यावर साजरा केल्या जायचा तर दुसरा सण रब्बी पिकं हातात आल्यावर साजरा केल्या जायचा. त्याला तिथ्या नव्हत्याच. त्यानंतर पुढं जेव्हा धर्म स्थापन झाला. त्या त्या धर्मानुसार तथाकथीत लोकांनी शेतकरी वर्गाचं काहीच चालू दिलं नाही आणि आपली मक्तेदारी स्थापन केली. कृषक वर्गाचं दिवाळी आणि होळी सणाबाबत अस्तित्वच समाप्त करुन टाकलं आणि आपलं अस्तित्व निर्माण केलं व दावेदारी ठोकली. दिवाळी हा सण आमचाच. मौर्य साम्राज्याच्या अस्तापर्यंत दिवाळी सणाची स्थिती ठीकच असेल. दिवाळी हा सण हिंदू वर्गीय लोकं उन्हाळ्यातच साजरा करीत असतील तर कोजागिरी पौर्णिमेला वर्षावास संपल्यानंतर बौद्ध धर्मीय लोकं दिवाळी सण साजरा करीत असतील. कारण दिवाळीचा मुळात अर्थ आनंद असा तथाकथीत लोकांनी घेतला. दिवाळी साजरी करायची म्हणजेच आनंद साजरा करायचा. असंच ठरल्यानं जेव्हा धर्म स्थापन झाले. तेव्हा प्रत्येक धर्माची दिवाळी वेगवेगळीच होती. असं जर होतं तर दिवाळीची ही तिथी हिंदूंची तिथी म्हणून का अस्तित्वात आली? असाही एक प्रश्न उपस्थित होतो. त्याचं कारण आहे, त्या काळातील वाद. त्याही काळात धर्माधर्मांचे वाद व्हायचे. आताच्या काळात जसे कधीकधी हिंदू मुस्लीम वाद होतात तसे. त्याही काळात वैदिक धर्म व बौद्ध धर्म वैदिक धर्म व जैन धर्म असे वाद व्हायचे. प्रत्येक धर्मीय माणसांना एकमेकांचे आचार विचार पटायचे नाहीत. पचायचेही नाहीत. मग वाद व्हायचे. त्यातच हत्याही. ज्यात राजा बृहद्रथच्या हत्येनंतर येथे राजपद धारण केलेल्या पुष्यमित्र शृंग घराण्यानं वैदिक धर्माला राजाश्रय दिला. कारण तो वैदिक धर्माचा पुरस्कर्ता होता व त्याच्याच राज्यात कितीतरी बौद्ध भिख्खूंची हत्या करण्यात आली. त्यातच गौतम बुद्धाच्या अगदी जवळचे असलेले शिष्य मोगलायन व सारीपुत्त यांचीही हत्या करण्यात आली व तो दिवस एक आनंद उत्सव म्हणून साजरा करण्यात आला. त्याला दिवाळी असं नाव देण्यात आलं. त्यानंतर परंपराच पडली की हाच दिवस दिवाळी म्हणून साजरा करायचा.

दिवाळीची ही तिथी मुळची शेतकरी वर्गाची तिथी होती. शेतीतून आलेल्या धान्यावर आनंद व्यक्त करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली तिथी. म्हणतात ना की दोघांचं भांडण व तिसऱ्याचा लाभ. परंतु यामध्ये दोघांचं भांडण झालं व तिसऱ्याचं नुकसान. वैदिक आणि बौद्ध धर्मियांचं भांडण. ज्यातून शेतकऱ्यांच्याच तिथीच्या दिवशी हत्या आणि मग परंपरा. आज दिवाळी म्हणून साजरी होत असलेली शेतकऱ्यांची तिथी मिटली नव्हे तर मिटवली गेली आहे आणि त्या जागेवर विशिष्ट अशा धर्मानं बाजी मारत आपली तिथी बनवली आहे. त्यानंतर ती बौद्ध धर्मीय लोकांची तिथी नव्हतीच. म्हणूनच त्यांनी त्यावरचे दावे करणे सोडून दिले आहे. शेतकरीही चूप बसले आहे. कारण त्यांना दिवाळीशी व तिथीशी काही घेणंदेणं नव्हतं आणि नाही. शिवाय ते अज्ञानी देखील होते. शिवाय त्या शेतकरी वर्गातील बरेचसे शेतकरी वैदिकच होते. तद्नंतर त्यात लक्ष्मी, कुबेर, गणपती शिरवल्या गेलीत. तद्नंतर रामालाही शिरवल्या गेलं. ज्यांचा या दिवाळीशी दूरचाही संबंध नव्हता. पुढं जेव्हा या भारतात मुस्लीम समुदाय आला व हिंदूंच्या हत्या करण्यात आल्या. तेव्हा या सणाला अधिक महत्व निर्माण झालं व घरोघरी हिंदू समुदाय मुस्लीम राजवटीतही मोठ्या प्रमाणात हा सण साजरा करु लागले. त्यानंतर इंग्रज आले व त्यांना हाकलून देण्यासाठी व हिंदूंना एकत्र करण्यासाठी या सणाची महती आणखीनच वाढली. त्याचं कारण होतं, असा सण साजरा करुन आपल्या धर्माबाबत लोकांच्या मनात आत्मीयता निर्माण करणं.

महत्वाचं सांगायचं झाल्यास आज दिवाळी साजरी होतोय हिंदूंचा एक सण म्हणून. त्याचं पावित्र्य जपलं जातं. घरोघरी आनंद सोहळा असतो. तोरणे, पताका लावल्या जातात. त्यातच हा सण हिंदूंचाच सण आहे असं गृहीत धरलं जातं. परंतु तो हिंदू नावाच्या एकाच धर्माचा सण नाही तर तो सर्व धर्मियांचाच सण आहे. ज्या ज्या धर्मात कृषक वर्ग आहे.आज शेतकरी कोणत्या धर्मात नाहीत. हिंदू, मुस्लीम, बौद्ध, जैन, शिख, पारशी, ख्रिश्चन या सर्व धर्मात शेतकरी आहेत व पर्यायानं सांगायचं झाल्यास हा सण त्या सर्वांनीच साजरा करायला हरकत नाही. परंतु हा सण साजरा करतांना ती मंडळी बंधन पाळतात. कोणी म्हणतात की दोन बौद्ध भिख्खू त्याच दिवशी मारले गेले. असे बोलून समाजात तेढ निर्माण केली जाते. असे जर आहे तर ज्या दिवशी धर्मवीर संभाजीची हत्या केली. तो गुढीपाडवा होता. तो सण हिंदू धर्मीय साजरा करतात की नाही. हत्या त्या काळात ह्या होणारच होत्या. त्याचं कारण होतं त्या काळात एकमेकांचे विचार न पटणं. कधी धर्मावरुन वाद व्हायचे व हत्या केली जायची. मग हत्या करतांना तिथी व दिवस पाहिल्या जात नव्हता. आजही हत्या केल्याच जातात अशाच कुविचारातून. उदाहरणार्थ ज्या दिवशी मुंबईत बॉम्बस्फोट झाला. ती तारीख होती २६/११. संविधान बनल्याची तारीख. याचा अर्थ तो काळा दिवस पाळून संविधान दिवस म्हणून ती तारीख साजरी करु नये काय? करायलाच पाहिजे. हत्या करणाऱ्यांना धडा शिकविण्यासाठी. हे जरी खरं असलं तरी आपण तो मुद्दा थोडासा बाजूला ठेवून व समाजातील दिवाळीबाबतची थोडीशी कलुषता बाजूला ठेवून, सर्व धर्मीयांनी हा सण सर्व मिळून गुण्यागोविंदानं साजरा करायला हवा. दिवाळी हा हिंदूचा सण म्हणून नाही तर तो शेतकऱ्यांचा सण आहे असं मानून. तेव्हाच आपण सहिष्णू आहोत याचा परीचय देता येईल. भारत आपला आहे. तो शेतकऱ्यांचा आहे तेवढाच तो सर्व धर्मियांचाही असून दिवाळी साजरी करण्याचा सर्वांनाच हक्कं आणि अधिकार आहे. त्यामुळंच त्यांनीही दिवाळी हा सण नेमका एका विशिष्ट धर्माचाच असं म्हणून वा मानून दिवाळी या सणाचा अपमान करु नये तर तो साजरा करुन दिवाळी या सणाचं महत्व वाढवावं. जेणेकरुन आपण आपला धर्माबाबत कितीही वाद असला तरी देशांतर्गत कोणताच वाद नाही हे सिद्ध होईल व आपली एकजुटता दिसेल व आपल्या एकतेचाही परीचय देता येईल हे तेवढंच खरं, यात शंका नाही.

**-अंकुश शिंगाडे,नागपूर**

# पत्रकार समाजातील सत्य परिस्थिती मांडतो. पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उध्दवराव सरोदे

**आत्ताच एक्सप्रेस**

**अर्धापूर/ प्रतिनिधी** / पत्रकार प्रत्येक बातमीसाठी आपला जीव जोखीमेत घालून बातमी घेत असतो त्यामुळे पत्रकारांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने मागणी केली असून प्रशासनाने पत्रकार संरक्षण कायदा लागू करून पत्रकारानां न्याय द्यावा कारण पत्रकार समाजाची सत्य परिस्थिती मांडतो आणि समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करतो असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य तालुका पत्रकार संघ अर्धापूरचे तालुकाध्यक्ष उध्दवराव सरोदे यांनी कार्यकारिणी च्या निवडीच्या वेळी भाजपा जिल्हाध्यक्ष अँड.किशोरजी देशमुख यांच्या संपर्क कार्यालयात केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश निवड समिती अध्यक्ष तथा दैनिक वाचकमत समीक्षा वर्तमान पत्राचे संपादक रूपेशजी पाडमुख व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे नांदेड जिल्हाध्यक्ष संग्रामजी मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अर्धापूर तालुका पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी व पदाधिकारी निवड करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष उध्दवराव सरोदे हे होते तर मंचावर पत्रकार संघाचे जिल्हा कार्यकारिणी शेख शकील,प्रभाकर वाघमारे,राजेश पंडित,वल्ली मोहम्मद खतीब,शेख मौला,वैभव माटे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रारंभी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना अभिवादन करण्यात येवून मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अँड.गौरव सरोदे यांनी सखोल मार्गदर्शन केले.यावेळी प्रभाकर वाघमारे,वल्ली मोहम्मद खतीब,राजेश पंडित,बिभिषण कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सुंदर सुत्रसंचलन प्रा. तान्हाजी मेटकर यांनी केले तर राजेश पळसकर यांनी आभार मानले.या कार्यक्रमात



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तालुका अर्धापूर कार्यकारणीची पुढील प्रमाणे निवड करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्ष :- उद्धवराव सरोदे, उपाध्यक्ष :- वल्ली मोहम्मद खतीब, शेख बशीर, सचिव :- वैभव माटे, शेख मौला, कार्याध्यक्ष :- अँड.गौरव सरोदे, कोषाध्यक्ष :- बिभिषण कांबळे, राजकिरण गव्हाणे, संघटक :- राजेश पंडित,व्यंकटी गोरे,प्रसिद्धि प्रमुख :- गंगाधर सुर्यवंशी, सल्लागार :- राजेश पळसकर, सदस्य :- प्रा.तानाजी मेटकर, प्रभाकर वाघमारे,राजेश चौधरी, सय्यद मंजूर अली,अमोल सरोदे, तुकाराम जोगदंड,विजय सरोदे यांच्या सह आदिंची निवड करण्यात आली. संयोजन समितीच्या वतीने सर्व नवनिर्वाचित महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तालुका अर्धापूर कार्यकारणीचे पदाधिकारी यांचा शाल,पुष्पहार देऊन अभिनंदन करून सत्कार करण्यात आला व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

# सरसगट मदतीच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड-परळी / प्रतिनिधी**/ सरसगट मदतीच्या नावावर शेतकऱ्यांच्या तोंडाची पाने पुसण्याचे काम सरकारकडून करण्यात आले असून जिल्ह्यात लाखो हेक्टर शेती क्षेत्र हे बागायती असताना बागायती मदतीपासून वंचीत ठेवण्याच्या संतापजनक प्रकार जिल्ह्यात घडला असून खरडून गेलेल्या जमिनी व विहिरीचे वास्तवीक पंचनामे करण्यात यावे, भावांतर योजना तर दूरच पण किमान शासकीय हमीभावाने सोयाबीन, कापूस खरेदी केंद्र सुरू करावे यासह इतर मागण्याकरिता बलिप्रतिपदा दिनी किसान सभा शेतकऱ्यांना घेऊन आंदोलन करणार असल्याची माहिती किसान सभेने दिली आहे.

सप्टेंबर मधील अतिवृष्टी आणि महापूर यामुळे जिल्ह्यातील शेती क्षेत्राचे अभूतपूर्व नुकसान झाले आहे.जिरायती, बागायती शेती क्षेत्र आणि त्यावरील पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या विदारक परिस्थितीत प्रशासनाने जिल्ह्यात पाटबंधारे विभागाच्या कमांड एरिया अर्थात सिंचन क्षेत्र असलेली २ लाख हेक्टर शेती क्षेत्र हे बागायती असताना जिल्हा प्रशासनाने केवळ १८ हजार एवढेच क्षेत्र बागायती दाखवल्याने बागायती क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांना देखील जिरायती क्षेत्राप्रमाणे तुटपुंज्या मदतीवर बोळवण करण्याचे काम प्रशासन आणि सरकारने केले आहे. बुजलेल्या, खचलेल्या विहिरीसाठी देखील अल्प मदत करत वाहून व खरवडून गेलेल्या शेतीची कामे देखील रोजगार हमी योजनेतून करणार असे सांगण्यात आले मात्र अद्याप ही यावर कोणतेही कार्यवाही सुरू करण्यात आलेली नाही.

जिल्ह्यात काही अंशी शेतकऱ्यांना सोयाबीन, कापूस या सारखे कमी उतारा आलेले पीक देखील बाजारात कवडीमोल विकावे लागत असल्याने शासनाने तात्काळ हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करावी. घोषीत केलेल्या कोट्यवधी रकमेपैकी दिवाळी गोड करण्याच्या नावाखाली केवळ ४५ रु गुंठा एवढी सरकारी मदत शेतकऱ्यांच्या खात्यात मिळत असल्याने सरकारी मदत म्हणजे जखमेवर मीठ लावण्यासारखी असून या परिस्थितीत किसान सभा पूर्णपणे शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणार आहे.

४२ रुपये गुंठ्यानं हेक्टरी ४२८१ रुपये ची अतिवृष्टीची मदत काही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होऊ लागली आहे जी अत्यंत तुटपुंजी व तोंडाला पान पुसणारी आहे.बुजलेल्या, खचलेल्या विहिरी यासाठी एमआरजीएस अंतर्गत केवळ ३० हजार रु मदत, या विरोधात तर कर्जमाफी आणि हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करा यासाठी किसान सभा बलिप्रतिपदेच्या दिवशी दि २२ ऑक्टोबर रोजी इडा पिडा टळो बळीच राज्य येवो यासाठी गावा-गावात, चौका-चौकात शेतकरी एकत्र येऊन सरकारविरोधी आंदोलन करणार आहेत.

# अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे प्रतीक दिवाळी सन - रचना पहाडे जैन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती सभाजीनगर/प्रतिनिधी**/अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे प्रतीक म्हणून या सणाला ओळखतात.विविध धार्मिक कार्यक्रम, देवता आणि व्यक्तिमत्त्वांशी दिवाळी जोडलेली आहे, जसे की राक्षस राजा रावणाचा पराभव करून राम आपली पत्नी सीता आणि भाऊ लक्ष्मण यांच्यासह अयोध्येत परतले. समृद्धीची देवी लक्ष्मी आणि बुद्धीची देवता आणि अडथळे दूर करणारा देव गणेश यांच्याशी देखील व्यापकपणे हा सण संबंधित आहे.इतर प्रादेशिक परंपरा या सणाला विष्णू, कृष्ण, दुर्गा, शिव, काली, हनुमान, कुबेर, यम, यमी, धन्वंतरी, किंवा विश्वकर्मा यांच्याशी जोडतात. प्रामुख्याने हिंदू सण असला तरी दिवाळीचे विविध प्रकार इतर धर्मांचे लोक देखील साजरे करतात.जैन लोक त्यांची स्वतःची दिवाळी पाळतात, जी महावीरांच्या अंतिम मुक्तिचे प्रतीक आहे.मुघल तुरुंगातून गुरू हरगोबिंद यांची सुटका झाल्याबद्दल शीख लोक बंदिछोर दिवस साजरा करतात.१३ नेवार बौद्ध हे इतर बौद्धांच्या विपरीत लक्ष्मीची पूजा करून दिवाळी साजरी करतात, तर पूर्व भारत आणि बांगलादेशातील हिंदू सामान्यतः देवी कालीची पूजा करून दिवाळी साजरी करतात.या उत्सवादरम्यान लोक त्यांची घरे, मंदिरे आणि कार्यस्थळे दिवे, मेणबत्त्या आणि कंदीलांनी प्रकाशित करतात.हिंदू उत्सवाच्या प्रत्येक दिवशी पहाटे तेलाने स्नान करतात.फटाके आणि रांगोळीच्या सजावटीसाठी देखील दिवाळी ओळखली जाते. मेजवानी आणि मिठाई हा या सणाचा मुख्य भाग आहे.केवळ कुटुंबांसाठीच नव्हे तर समुदाय आणविशेषतः शहरी भागातील लोकांसाठी दिवाळी म्हणजे वार्षिक एकत्र येण्याचा कालावधी असतो. शहरांतील उद्यानांमध्ये संगीत आणि नृत्य सादरीकरणासह सामुदायिक मेळ्यांचे आयोजन केले जाते.काही हिंदू, जैन आणि शीख लोक सणासुदीच्या काळात जवळच्या आणि दूरच्या कुटुंबांना दिवाळी ग्रीटिंग कार्ड आणि भारतीय मिठाई पाठवतात. सणाचा आणखी एक पैलू म्हणजे पूर्वजांचे स्मरण.हिंदू, शीख आणि जैन लोकांसाठी दिवाळी हा एक प्रमुख सांस्कृतिक कार्यक्रम आहे.

## संक्षिप्त

### लासुर स्टेशन येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत उभारणार एक कोटी पन्नास लाख रुपयांचे शेतकरी भवन



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/** गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथील मराठवाड्यातील दुसऱ्या क्रमांकाची कृषी उत्पन्न बाजार समिती असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात तब्बल एक कोटी पन्नास लाख रुपये खर्चून भव्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यात येणार आहे तसा शासन निर्णय निर्गमित झाला आहे दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन या योजनेंतर्गत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती असलेल्या ठिकाणी शेतकरी बांधवांना मुक्कामाची सोय व्हावी तसेच शेतकऱ्यांच्या मूलभूत सुविधा देखील त्याच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने ज्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी भवन उपलब्ध नाही तेथे नवीन शेतकरी भवन बांधणे तसेच ज्या बाजार समितीच्या परिसरात शेतकरी भवन अस्तित्वात आहे परंतु सुस्थितीत नाही अशा शेतकरी भवनाची दुरुस्ती करण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी १९ डिसेंबर २०२३ रोजीच्या,शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून सदर योजनेंतर्गत उपसंचालक (पणन), पुणे यांनी संदर्भ क्र.५ येथील पत्रान्वये सादर केलेल्या कृषि उत्पन्न बाजार समिती, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर येथे नवीन शेतकरी भवन बांधण्याच्या एकूण रु.१,४९,२४,६५७/- लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचे आदेश बाजार समिती प्रशासनाला प्राप्त झाले आहेत लासूर स्टेशन येथील बाजार समितीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन लासुर बाजार समितीत मंजूर व्हावे यासाठी आ.प्रशांत बंब व आ.रमेश बोरणारे यांनी शासन दरबारी विशेष प्रयत्न केले होते त्यामुळे बाजार समितीचे सभापती शेषराव नाना जाधव, उपसभापती अनिल पाटील चव्हाण,संचालक सर्वश्री. ताहेर पटेल,संतोष जाधव,मनिष पोळ,सुरेश जाधव. सुनील पाखरे,अशोक जगताप,संभाजी जगताप,संजय केरे,रितेश मुनोत,नंदकुमार कुकलारे,प्रकाश मुथा,सुबोधकुमार मुथा,दिनेश मुथा,ज्योती कैलास पाटील कुऱ्हाडे, संगीताताई चिंधे,सचिव एस.एस.पवार,सहसचिव अमोल नरोडे यांनी दोन्ही आमदार महोदयाकडे विशेष पाठपुरावा केला होता.

### जवखेडा बु येथील अंजनाबाई हराळ यांच निधन



**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील जवखेडा बु.येथील अंजनाबाई कडुबा हराळ वय ७५ वर्ष यांचे दि.१७ शुक्रवार रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास वृध्दापकाळाने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी सात वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात. दोन मुले, मुलगी, सुंना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.सुरेश हराळ, संतोष हराळ यांच्या त्या मातोश्री होत.

### अपघातात जखमी झालेल्यांना हिट ॲण्ड रन प्रकरणी नुकसान भरपाई मिळत नसल्याने आमरण उपोषण

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी /** फुलंब्री तालुक्यातील जातवा गावाचे रहिवासी गौतम बनकर यांचा उमरावती येथे अपघात झाला होता. अपघाताचा गुन्हा वडोद बाजार पोलीस ठाणे येथे दाखल आहे. शासनाने जखमी इसमासाठी पन्नास हजार रुपये मिळतात. हिट अँड रन कायदा नुकसान भरपाई योजना २०२२ जाहीर केलेली आहे.

याबाबत देशाचे सुप्रीम कोर्टाने सबंधित यंत्रणेला आदेश दिलेले आहे. जर एखादी व्यक्ती रोड अपघातात जागेवर मरण पावली.तर त्यांच्या वारसास दोन लाखापर्यंत अनुदान दिले जाते. त्यासाठी संबंधित पोलिस ठाणे यांच्यामार्फत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा लागतो.वडोद बाजार पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील इंगळे यांनी जातवा येथील रहिवासी गौतम सांडू बनकर यांचा हिट अँड रन कायदा चा परिपूर्ण प्रस्ताव उपविभागीय अधिकारी फुलंब्री यांच्या कार्यालयाकडे आतापर्यंत दोन ते तीन वेळेस परिपूर्ण प्रस्ताव एक वर्षापासून सादर केलेला आहे. परंतु दावा चौकशी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी निलम बाफना प्रस्तावामध्ये वारंवार त्रुटी काढत आहे. उपविभागीय अधिकारी निलम बाफना यांना पत्राद्वारे विनंती राहील की गौतम बनकर यांचा हिट अँड रन कायदा चा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय कडे मंजुरीसाठी तात्काळ पाठवावा . जोपर्यंत सदर प्रकरणात न्याय मिळत नाही तोपर्यंत भारतीय राज्य घटनेच्या कलम १९ द्वारे आपल्या औरंगाबाद येथे उप-विभागिय कार्यालयासमोर दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ पासून आमरण उपोषण करण्यात येईल.याची आपल्या कार्यालयाने नोंद घ्यावी.याबाबतचा अर्ज आनंद बनकर यांनी मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद व जिल्हा अधिकारी साहेब कार्यालय औरंगाबाद यांच्याकडे दिला आहे.

# दुर्दैवी शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना जिल्हा प्रशासनाने दिला मदतीचा हात

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ उदय कुलकर्णी/** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी तथा कन्नड - खुलताबाद तालूका प्रशासनाने दोन्ही तालुक्यातील दुर्दैवी आत्महत्याग्रस्त शेतकरी तसेच नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीने होत्याचे न्हवते झालेल्या शेतकरी कुटुंबियांच्या मदतीला हातभार लावून विविध रूपात मदत करून दीपावली गोड करून देण्याचा गौरतुल्य उपक्रम राबविला आहे. कन्नड - खुलताबाद तालुक्यातील दुर्दैवीरित्या आत्महत्या केलेल्या शेतकरी व नुकत्यात झालेल्या अतिवृष्टीने होत्याचे नव्हते झालेल्या कुटुंबियांच्या पाठीमाघे छ.संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी तसेच दोन्ही तालुक्याचे प्रशासन एकजुटीने उभे राहून दिवाळी पूर्वी सदर कुटुंबियांस एक हात मानव धर्मासाठी हा उपक्रम राबविला आहे.या देण्यात आलेल्या मदतीत कन्नड तालुक्यातील आत्महत्यग्रस्त एकूण ४१,तर खुलताबाद तालुक्यातील चार असे एकूण ४५ तर इतर आपत्तीग्रस्त म्हणून नोंद झालेले सहा असे एकूण ५१ कुटुंबियांना या मदतीच्या किटचे वाटप करण्यात आले आहे.दोन्ही तालूका



स्तरावर सेवा पंधरवड्याचे औचित्य साधून करण्यात आलेल्या सर्वनुसार हा भरघोस मानवतेचा हात देऊन धीर दिला आहे.त्याच प्रमाणे शासनाच्या इतरही योजणांचाही लाभ ज्यात संजय गांधी निराधार,श्रावण बाळ या सारख्या सामाजीक योजणांसह जीवनावश्यक वस्तूंचाही लाभ मिळून दिला.यात जवळज-वळ सर्वच प्रशासकीय अधिकारी,कर्मचारी वर्गानेही आपल्या परीने योगदान देऊन आपल्या परीने हातभार लावला.या आयोजीत कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी भूषविले तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी केले तर आभार तालूका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ यांनी मानले,यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री,जिल्हा संपर्क नियोजन अधिकारी भरत वायाळ,खुलताबादचे तहसीलदार स्वरूप कंकाळ,कन्नडचे नायब तहसीलदार प्रशांत काळे,सहाय्यक गट विकास अधिकारी,विजय पंडित,गट शिक्षणाधिकारी सबाहत शेख, एकात्मिक बाल विकास अधिकारी निलेश राठोड,हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रवीण दाभाडे यांनी केले.

## ‘सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा’ विशेष तपासणी अभियानांतर्गत राज्यात ३ हजार ४८५ अन्न आस्थापनांची तपासणी

**अन्न व औषध प्रशासन विभागाची माहिती**

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत राज्यात ‘सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा’ हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत राज्यात ३ हजार ४८५ अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये दूध, खवा/मावा, खाद्यतेल, तूप, मिठाई, ड्रायफ्रूट्स, चॉकलेट्स, भगर व अन्य अन्नपदार्थांचे एकूण ४ हजार ६७६ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. या तपासणीत अनियमितता आढळलेल्या एक हजार ४३१ आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली असून ४८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले तर एका आस्थाप-नेचा परवाना रद्द करण्यात आला असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाने दिली आहे.जनतेस सुरक्षित, दर्जेदार अन्न उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री योगेश कदम, सचिव धीरज कुमार व आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासना विभागांमार्फत राज्यात सणासुदीच्या कालावधीत अन्नपदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी ‘सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा’ हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान दिनांक ११ ऑगस्ट २०२५ ते २५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे.नागरिकांनीही सणासुदीच्या काळात अन्नपदार्थ खरेदी करताना गुणवत्ता, पॅकिंगवरील माहिती आणि परवाना क्रमांक यांची खात्री करूनच खरेदी करावी. भेसळीबाबत संशय आल्यास जवळच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाने केले आहे.

# छत्रपती संभाजीनगरात रविवारी भिक्खू करूणानंद थेरो यांचा ऐतिहासिक महाथेरो समारंभ व कठीण चिवरदान धम्मसोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** आपल्या प्रेरणादायी धम्मदेसनांद्वारे बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला आदर्श बौद्ध समाज निर्मितीसाठी धम्म प्रचार-प्रसाराच्या कार्याला वाहून घेतलेले भिक्खू करूणानंद थेरो यांचा महाथेरो समारंभ आणि कठीण चिवरदान धम्मसोहळा रविवारी (१९ ऑक्टोबर) रोजी नागसेन वनातील मिलिंद महाविद्यालयाच्या मैदाना-वर आयोजित करण्यात आला असल्याची माहिती या समारंभाचे निमंत्रक आणि बीडच्या नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. अशा प्रकारचा हा महाराष्ट्रातील पहिलाच धम्म समारंभ असून या ऐतिहासिक सोहळ्यासाठी राज्यभरातून १५ ते २० हजार उपासक-उपासिका उपस्थित राहतील, असेही प्रा. रोडे म्हणाले.

भिक्खू करूणानंद थेर-ो यांच्या भिक्खू जीवनातील विसाव्या वर्षावासाचा समारोप हा एक अत्यंत महत्वाचा आणि ऐतिहासिक क्षण ठरणार आहे. या वर्षावास अधिष्ठान संपन्नतेद्वारे भिक्खू करूणानंद थेरो हे ‘महा-थेरो’ या ज्येष्ठतेला पात्र ठरणार असून या कार्यक्रमाचे औचित्य साधून भिक्खू संघास दिल्या जाणाऱ्या कठीण चिवरदान दिले जाणार असून भिक्खू संघाकडून हे कठीण चिवरदान भिक्खू करूणानंद थेरो यांना प्रदान करण्यात येणार आहे.

भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आणि समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते १९ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता या धम्मसोहळ्याचे उद्घाटन होणार आहे. दर्शनशास्त्र व ३७ बोधिपाक्षीय धम्माचे गाढे अभ्यासक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाच्या महाराष्ट्र शाख-ेचे अध्यक्ष भिक्खू धम्मसेवकजी महास्थवीर या समारंभाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी भिक्खू शरणानंद महाथेर-ो, प्राचार्य भिक्खू डॉ. खेमधम्मो महाथेरो, भिक्खू बोधीपालो महा-थेरो, भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो, भिक्खू विशुधानंदबोधी महाथेरो, बेंगळुरूचे भिक्खू विनयरक्खित महाथेरो, भिक्खू ज्ञानज्योती महाथेरो यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या धम्मसोहळ्यात नागपूरचे भिक्खू प्रा. डॉ. चिं-चाळ मेत्तानंद महाथेरो, भिक्खू प्रा.डॉ. एम. सत्यपाल महा-थेरो, भिक्खू सुमनवन्नो महा-थेरो, भिक्खू संघपाल महाथेरो आणि भिक्खू सत्यानंद महाथेरो



हे मार्गदर्शन करणार असल्याचेही प्रा. रोडे यांनी सांगितले.या धम्म सोहळ्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रकुलगुरू प्रा. डॉ. वाल्मिक सरवदे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे विभागीय अध्यक्ष अनिल साबळे, मिलिंद महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान, स्मार्ट सिटीचे उपायुक्त रविंद्र जोगदंड, जिल्हा परिषदेचे प्रकल्प संचालक अशोक सिरसे, आंतरराष्ट्रीय गायक पावा, सा.बां. वि. चे अध-ीक्षक अभियंता एस. एस. भगत, दैनिक सम्राटचे संपादक कुणाल कांबळे आणि निवृत्त कार्यकारी अभियंता अशोक येरेकार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आ-हेत. या धम्मसोहळ्यात १०० थाई चिवर सेट भिक्खू संघाला दान करण्यात येणार आहेत. सायंकाळी ७.३० वाजता प्रा. संजय मोहोड आणि संचाकडून धम्मपदावर आधारित विशेष सांस्कृतिक कार्यक्रम व गीत भीमायन ही संगीत मैफल होणार आहे.

या कार्यक्रमाला राज्यभरातून १०० हून अधिक भिक्खूही उप-स्थिती लावणार आहेत, अशी माहिती प्रा. रोडे यांनी दिली.

यावेळी भिक्खू करूणानंद थेर-ो यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाची रुपरेषा अशीः रविवारी सकाळी ९ वाजता धम्मध्वजारोहण व महामानवास अभिवादन, सकाळी ९.३० वाजता परित्राण पाठ व मंगलमैत्री पूजा, सकाळी १०.३० वाजता भिक्खू संघ आणि उपस्थितांना भोजनदान, दुपारी १२ वाजता कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ, दुपारी १२.३० वाजता त्रिशरण पंचशील प्रदान विधी, दुपारी १ वाजता भिक्खू संघ व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत, दुपारी १.३० वाजता प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचे मनोगत, दुपारी २ वाजता धम्मदेसना, सायंकाळी ६ वाजता संघदान व कठीण चिवरदान विधी आणि सायंकाळी ६.३० वाजता महाथेरो जाहीर विधान घोषणा अशी या धम्मसोहळ्यातील कार्यक्रमांची रुपरेषा आहे.

# अंध:कारातून प्रकाशाकडे : अंधश्रद्धा निर्मूलनाचा समाजशास्त्रीय प्रवास

अंधश्रद्धा ही केवळ वैयक्तिक श्रद्धेची किंवा धार्मिक भावनेची बाब नाही; ती आपल्या समाजाच्या संरचनेत, संस्कृतीत आणि सत्तासंबंधांमध्ये खोलवर रुजलेली सामाजिक वास्तवता आहे. भारतीय समाजशास्त्रीय जीवनाचा अभ्यास केल्यास दिसते की श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांचा परस्परसंबंध हा मानवाच्या सामाजिक व मानसिक गरजांशी निगडित आहे. श्रद्धा व्यक्तीला आधार देते, आशा देते, पण विवेकशून्य श्रद्धा म्हणजेच अंधश्रद्धा समाजाला अंधारात ढकलते. इमाईल दुर्खीमच्या ‘सामूहिक चेतना’ या संकल्पनेप्रमाणे समाजातील विश्वास प्रणाली ही एकात्मतेचे साधन असते; परंतु जेव्हा ही चेतना अज्ञान, भीती आणि सत्तेच्या रचनेशी गुंतते, तेव्हा ती दमनाचे साधन बनते.

भारतीय समाजात अंधश्रद्धेचा इतिहास प्राचीन धार्मिक संस्कृतीशी जोडलेला आहे. ग्रहदोष, अपशकुन, शुद्ध-अशुद्धतेचे निकष, जातिव्यवस्था, स्त्रीविषयक बंधने या सर्वांनी समाजात रूढ झालेल्या श्रद्धांना ‘दैवी सत्य’ म्हणून मान्यता दिली. काळ जस-जसा पुढे गेला तसतसे विवेक व तर्क यांची जागा अंधश्रद्धेने घेतली. समाजात स्त्रियांवर झालेली अन्यायपूर्ण बंधने, मासिक पाळीशी निगडित अपवित्रतेचे समज, विधवांना समाजातून बहिष्कृत करणे, ‘डायन’ ठरवून महिलांवर अत्याचार करणे या सर्व घटना समाजाच्या सांस्कृतिक अधो-गतीचे द्योतक ठरल्या. या अंधश्रद्धांना ब्रिटिशकालीन समाजसुधारकांनी आणि नंतर राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार, महात्मा गांधी अशा समाजप्रबोधनकारांनी आव्हान दिले. त्यांनी विज्ञानाधारित विचारसरणी, शिक्षण आणि समानतेचा पुरस्कार करून समाजात विवेकवाद रुजवला.

तथापि, आधुनिक भारतात अंधश्रद्धा संपलेली नाही; ती नव्या स्वरूपात जिवंत आहे. आज अंधश्रद्धा बाजारपेठेतून विकली जाते. तंत्र-मंत्र, ग्रहदोष, वास्तुशास्त्र, अंकशास्त्र, ऑनलाइन भविष्यवाणी, चमत्कार विक्री हे त्याचे आधुनिक रूप आहे. या नव्या अंधश्रद्धा शिक्षित वर्गालाही जखडतात, कारण त्या भीती आणि असुरक्षिततेवर पोसल्या जातात. समाजशास्त्रीय विश्लेषणानुसार अंधश्रद्धा टिकते कारण ती समाजातील सत्ता-संबंधांना पूरक ठरते. धर्म, जात आणि लिंग या रचनेतून मिळणाऱ्या सत्त-ेचा लाभ घेणारे घटक अंधश्रद्धेचे पोषण करतात. दैवी इच्छा, कर्मफळ, ग्रहदोष अशा संकल्पनांद्वारे लोकांना विद्यमान असमानतेला नैसर्गिक मान्यतेचे रूप दिले जाते. गरीब माणूस आपल्या दारिद्र्याला देवाची शिक्षा मानतो, स्त्री आपली दुय्यम स्थिती कर्माचा परिणाम मानते, आणि अशा प्रकारे अंधश्रद्धा विषमता टिकवते.

सांस्कृतिक दृष्टिकोनातून पा-हता, परंपरा आणि अंधश्रद्धा यांचा घनिष्ट संबंध आहे. परंपरा सामाजिक एकात्मतेचे प्रतीक असली, तरी जेव्हा ती प्रश्न विचारण्यास नकार देते, तेव्हा ती अंधश्रद्धेत रूपांतरित होते. परंपरा व्यक्तीला सांत्वन देते, पण जेव्हा ती विवेकावर पडदा टाकते, तेव्हा सामाजिक प्रगती थांबते. भारतीय समाजात अनेक पारंपरिक विधी आणि सण सामाजिक संबंध दृढ करतात, पण त्याचबरोबर काही रूढी आरोग्य, शिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य आणि सामाजिक निर्णयक्षमतेवर मर्यादा घालतात. या रूढींच्या व्यावसायिकीकरणामुळे अंधश्रद्धा आज उद्योग बनली आहे, चमत्कार विक्री, पूजा-पाठांचे पॅकेज, शुभरंग, वास्तु उपाय, रत्नधारण या साऱ्यांनी विवेकाचा व्यापार सुरू केला आहे. म्हणूनच बदलाचा मार्ग म्हणजे परंपरेचा नकार नव्हे, तर तिचे तर्कसंगत पुनर्निर्देशन होय. अंधश्रद्धेचे आर्थिक स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आहे. समाजातील गरिबी, शिक्षणाचा अभाव आणि आरोग्यसेवेची अनुपलब्धता या सर्व गोष्टी अंधश्रद्धेला खतपाणी घालतात. असुरक्षिततेच्या काळात व्यक्तीला आपले प्रश्न दैवी कारणांतच उत्तर दिसते. ग्रामीण भारतात अजूनही आजारपणाला देवदंड मानले जाते, आणि झाडफुंक, बळी, तांत्रिक विधी अशा अवैज्ञानिक उपचारांचा अवलंब केला जातो. या परिस्थितीत तांत्रिक, ज्योतिषी आणि ढोंगी बाबांचा उदय होतो, जे लोकांच्या भीतीचा व्यापार करतात. त्यामुळे अंधश्रद्धा ही केवळ श्रद्धा नसून आर्थिक शोषणाचे साधन बनते. सामाजिक विषमतेत ती सत्ताधारी घटकांना आपला अधिकार टिकवून ठेवण्यासाठी एक वैध साधन पुरवते.अंधश्रद्धेचा स्त्रियांच्या जीवनावर विशेषतः भयावह परिणाम होतो. अनेक समाजांमध्ये महिलांना डायन, मंगळिक, अपशकुनी अशा लेबलांनी ओळख-ले जाते. अशा महिलांवर सामाजिक बहिष्कार, अत्याचार, मालमत्तेतील हक्क नाकारणे आणि आरोग्यसेवेपासून दूर ठेवणे ही सामान्य बाब आहे. पियर बोरद्यूच्या ‘प्रतिकात्मक हिंसाचार’ या संकल्पनेनुसार, अशा अंधश्रद्धात्मक आरोपांद्वारे समाज स्त्रियांचे स्वायत्त अस्तित्व नियंत्रित करतो. ही हिंसा नेहमी शारीरिक नसते; ती मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वरूपात होते. म्हणूनच अंधश्रद्धेविरुद्धच्या लढ्यात स्त्रीशिक्षण, आरोग्यसेवा, आर्थिक स्वावलंबन आणि समुदायस्तरीय संवाद ही महत्त्वाची साधने आहेत.अंधश्रद्धा निर्मूलनासाठी विज्ञान आणि तर्कशक्ती हाच सर्वात प्रभावी पर्याय आहे. विज्ञान माणसाला प्रश्न विचारायला शिकवते, निरीक्षणाद्व-ारे सत्य तपासायला प्रवृत्त करते. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी तुम्ही मानायला मोकळे आहात, पण तपासायला विसरू नका हा अत्यंत क्रांतिकारी संदेश दिला, जो विवेकवादाच्या चळवळीचा पाया ठरला. त्यांच्या या विच-ारसरणीने धार्मिक आंधळेपणा, तंत्र-मंत्र आणि ग्रहदोष यांसारख्या गैरवैज्ञानिक समजुतींना थेट सामाजिक आव्हान दिले. भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१(अ) (ह) मध्येही प्रत्येक नागरिकाने वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि सुधारक वृत्ती जोपासावी, असे स्पष्टपणे नमूद आहे. महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन आणि काळी जादू प्रतिबंध कायदा, २०१३ हा याच दिशेने उचललेला ऐतिहासिक पाऊल ठरला आहे.

शिक्षण आणि माध्यमे ही अंधश्रद्धा निर्मूलनाची दोन अत्यावश्यक स्तंभ आहेत. शालेय शिक्षणात वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशक्ती आणि विवेकवाद यांचा समावेश करणे आवश्यक आहे. माध्यमांनी देखील लोकजागृतीची जबाबदारी ओळखली पाहिजे. दुर्दैवाने, काही माध्यमे अंधश्रद्धेला बळ देतात, भविष्य सांगणारे कार्यक्रम, ज्योतिष सल्ले, आणि चमत्कारांचे प्रक्षेपण समाजाच्या विवेकाला भ्रमित करतात. उलट, विज्ञानाधारित माहितीपट, विवेकवादी चर्चा आणि सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम समाजातील बौद्धिक वातावरण समृद्ध करू शकतात.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पा-हता, अंधश्रद्धा निर्मूलन ही केवळ व्यक्तीगत नव्हे तर सामूहिक प्रक्रियाही आहे. समाजातील बदल सामूहिक चेतनेवर अवलंबून असतो. म्हणून ग्रामपंचायतींपासून विद्यापीठापर्यंत विवेक मंच, विज्ञान मेळावे, लोकशिक्षण आणि चर्चासत्रे आयोजित करणे आवश्यक आहे. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी शासन, शिक्षणसंस्था, स्वयंसेवी संस्था, आणि सामान्य नागरिक यांचा सहभाग अत्यावश्यक आहे.अंधश्रद्धा ही समाजाच्या प्रगतीसमोरील सर्वात मोठा अडथळा आहे. ती व्यक्तीची विचारशक्ती कुंठित करते आणि समाजाला स्थैर्याऐवजी अस्थिरता आणते. समाजशास्त्रीय, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहता, अंधश्रद्धा निर्मूलन ही केवळ मोहीम नाही, तर ती सामाजिक क्रांती आहे. शिक्षण, विज्ञान, तर्कशक्ती आणि विवेक या चार आधारस्तंभांवरच समाजाचा प्रकाशमान भविष्यकाळ उभा राहू शकतो. अंध:कारावर प्रकाशाचा विजय तेव्हाच खरा ठरेल, जेव्हा प्रत्येक मनात विवेकाचा दिवा पेटेल आणि हा दिवा ज्ञानाचा, विज्ञानाचा आणि मानव-तावादाचा असेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## सुरेल सुरांनी उजळली दिवाळी पहाट




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** संस्कृती मंच, जालनातर्फे आयोजित १८ वी दिवाळी पहाट सुरांच्या सुमधुर लहरींनी उजळून निघाली. सुप्रसिद्ध युवा गायक राजयोग धुरी यांच्या स्वरांनी या दिवाळी पहाटेचा मंगल आरंभ झाला. त्यांनी राग अहिर भैरवमधील अलबेला सजन आयो रे या बंदिशीने कार्यक्रमाची सुरुवात करताच सभागृहात भावमय वातावरण निर्माण झाले.यानंतर माझे माहेर पंढरी, वृंदावनी वेणू, हे सुरांनो चंद्र व्हा, नाथ हा माझा, काटा रुते कुणाला, ऐसी लागी लगन, घेई छंद मकरंद अशा एकापाठोपाठ एक भावपूर्ण गीतांनी श्रोत्यांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचा समारोप कानडा राजा पंढरीचा या भक्तिगीताने झाला, ज्यावर उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त टाळ्यांचा वर्षाव केला.कार्यक्रमासाठी संवादिनीवर प्रवीण बांदकर, तबल्यावर सौरभ पैठणकर, पखवाजवर अक्षय शेवडे, व्हायोलिनवर प्रज्ञा देसाई, तर साईड रिदमवर उद्धव कुंभार यांनी साथ संगत करून कार्यक्रम अधिक सुरेल बनवला. नीता पानसरे यांनी प्रभावी निवेदनाद्वारे कार्यक्रमाचा धागा घट्ट धरून ठेवला. सुरुवातीला किशोर देशपांडे यांनी प्रास्ताविक केले तर शेवटी उपस्थितांचे आभार संजय देशपांडे यांनी मानले.संस्कृती मंचच्या पदाधिकाऱ्यांनी परंपरेप्रमाणे यावर्षीही उत्कृष्ट आयोजन करत जालना शहरातील दिवाळी पहाटेची १८ वर्षांची उज्वल परंपरा अधिक समृद्ध केली. सुरेल गायन, भावनांनी ओथंबलेले सूर आणि रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने ही दिवाळी पहाट यंदाही अविस्मरणीय ठरली.

# पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी अनाथ मुलांसोबत साजरी केली दिवाळी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** दिवाळीचा सण म्हणजे फक्त दिव्यांचा, फटाक्यांचा किंवा सजावटीचा उत्सव नाही तर तो माणुसकीचा, प्रेमाचा आणि एकोप्याचा उत्सव आहे, हा विचार करून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी आज एका आगळ्यावेगळ्या आणि हृदयस्पर्शी कार्यक्रमात अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी केली. या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मंत्री श्रीमती मुंडे भावूक झाल्या.



केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालय आणि द चिल्ड्रन्स एड सोसायटी फॉर अंडरप्रिव्हिलेज्ड किड्स ऑर्फनेजच्या यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आधुनिक कला दालन, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात श्रीमती मुंडे यांनी भेट दिली. यावेळी आधुनिक कला संग्रहालयाच्या संचालक निधी चौधरी उपस्थित होत्या.

**मुलांसोबत पणती रंगविण्यात आणि आकाश कंदील बनविण्यात उत्साहाने घेतला सहभाग**

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, ही अनाथ मुलं कोणत्या जातीची, धर्माची आहेत हे महत्त्वाच नाही, तर ती माणसाची आहेत आणि त्यांच्या डोळ्यांतील आनंद हा समाजासाठी प्रेरणादायी आहे. असा समाज घडला पाहिजे, जिथे प्रत्येक माणूस स्वतःची ओळख स्वतः निर्माण करेल.

प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी पर्यावरण विभागाने समाज माध्यमांद्वारे जनजागृती केली आहे, असे सांगून सर्व नागरिकांनी प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

आपण ध्वनी आणि वायू प्रदूषण टाळून, निसर्गाशी सुसंगत अशी पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करू, असे श्रीमती मुंडे म्हणाल्या.यावेळी मंत्री पंकजा मुंडे यांनी मुलांसोबत आकाशकंदील तयार केले.

तसेच पणत्या रंगवल्या आणि चित्रकला उपक्रमात सहभागही घेतला. या वेळी आकाश कंदील बनविण्याची कार्यशाळेचे आणि प्रसिद्ध कलाकार ए. ए. अल्मेलकर यांच्या कलाकृतीच्या प्रदर्शनाचे उद्घाटन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

# ग्रामीण भूमिहीन लाभार्थ्यांना प्राधान्याने घरकुलाचा लाभ द्यावा - ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनेतंर्गत घरकुलाचे काम व्यापक प्रमाणात सुरु असून त्याअंतर्गत ७२ हजार ९७ घरकुल पूर्ण झाले असल्याचे सांगून भूमिहीन लाभार्थ्यांवर विशेष लक्ष देऊन त्यांना प्राधान्याने घरकुलाचा लाभ द्यावा, तसेच पुढील उद्दीष्टेही गतीने पूर्ण करावे, असे निर्देशही ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.ग्रामीण गृहनिर्माणाच्या कामांबाबत मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत मंत्री श्री. गोरे यांनी संबंधितांना निर्देशित केले.बैठकीस ग्रामविकास प्रधान सचिव एकनाथ डवले, ग्रामीण गृहनिर्माण संचालक, डॉ. राजाराम दिघे तसेच ग्रामविकास विभागातील संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत योजनेच्या विविध उपक्रमांमध्ये लक्षणीय प्रगती झाली आहे. अभियानाच्या माध्यमातून: प्रधानमंत्री आवास योजना झच-ध-ऋ टप्पा १ आणि २०२४-२५ पूर्वीच्या राज्य योजनांतील १७,८५९ घरकुले व झच-ध-ऋ टप्पा २ तसेच २०२४-२५ पासूनच्या राज्य योजनांतील ५४,२३८ घरकुले अशी एकूण ७२,०९७ घरकुले आत्तापर्यंत पूर्ण झाली आहेत. या व्यतिरीक्त सुमारे ३० लाख घरकुलांची कामे प्रगतीपथावर असून या कालावधीत ६,०७५ भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा उपलब्ध करण्यात आली आहे. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्याचे पक्के घर या उद्दिष्टाकडे ग्रामविकास विभाग सातत्याने वाटचाल करत. यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात ग्रामीण आवास योजनांसाठीच्या उपक्रमांमध्ये झालेल्या प्रगतीबाबत मंत्री श्री.गोरे यांनी समाधान व्यक्त करुन राज्य व क्षेत्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे त्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल कौतुक केले.



मंत्री गोरे यांनी सांगितले की, ग्रामीण महाराष्ट्र सक्षम करायच्या उद्दीष्टाने घरकुल पूर्णतेचा वेग अधिक वाढवावा. लाभार्थी केंद्रित दृष्टिकोनाने काम करावे. भूमिहीन लाभार्थ्यांवर विशेष लक्ष देण्यात यावे. तसेच लाभार्थ्यांना मनरेगा अंतर्गत मजुरीचा लाभ मिळवून देण्याची कार्यवाही करण्यात यावी. झच-ध-ऋ टप्पा २ मधील घरकुलांना सौरऊर्जेचा लाभ देण्यावर भर द्यावा. यासोबतच नाविन्यपुर्ण उपक्रम राबवण्याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांना मंत्री श्री. गोरे यांनी निर्देश दिले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्ग दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते दि ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा एक आणि राज्य पुरस्कृत योजनेतील १ एप्रिल २०२५ पुर्वीचे आणि नवीन घरकुले अभियान कालावधीत पूर्ण करणे, घरकुल मंजूर झालेल्या परंतु जागा नसलेल्या सर्व पात्र भूमिहीन लाभार्थ्यांना अभियान कालावधीत जागा उपलब्ध करून देणे, सर्व मंजूर घरकुल लाभार्थ्यांना मनरेगा अंतर्गत लाभ देणे, प्रधानमंत्री सुर्यघर योजना/अन्य योजनेतून टप्पा-२ मधील मंजूर सर्व घरकुलांना सौर ऊर्जा प्रकल्प बसवणे, असे उपक्रमनिहाय उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.



जालना : शहरात दिवाळीच्या पार्श्वभूमीवर टोपल्या, झाडू व सुपाला मागणी असल्याने या वस्तू बनविताना महिला कारागीर. (छाया : मजहर सौदागर)

## पुढील दोन दिवसांत जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणार!

**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी आज बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि अडचणी यांची सविस्तर चर्चा केली. मागील भेटीच्या वेळी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी ट्रस्टकडून करण्यात आली होती. या मागणीवर जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शेतकऱ्यांना येत्या एक ते दोन दिवसांत मदतीचे वाटप केले जाणार असल्याचे आश्वासन दिले.तसेच अतिवृष्टीमुळे खरवडून गेलेल्या जमिनींचे पंचनामे करून संबंधित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे




काम येत्या काही दिवसांत पूर्ण करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. ग्लोबल विकास ट्रस्टकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला जात असून, नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळावा, यासाठी जलनायक मयंक गांधी प्रयत्नशील आहेत.

## कायद्याच्या ज्ञान स्वरूपी प्रकाशाने दिवाली साजरी करावी- अँड .अश्विनी धन्नावत

**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर (प्रतिनिधी)** दिवाली मुहूर्तावर आयोजित अखिल भारतीय अग्रवाल विधी प्रकोष्ट , मुंबई आयोजित कायदेशीर जनजागृती कार्यक्रमात बोलताना, ड .अश्विनी धन्नावत यांनी समाजातील गैरप्रकार आणि अवैध कृत्ये संपवण्यासाठी भारतीय संविधान आणि कायद्याच्या शक्तीचा वापर करण्याचे आवाहन केले. आपल्या संविधानाने आणि कायद्याने दिलेले अधिकार हेच आपले शस्त्र आहेत. आपल्यातील आणि समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि महिलांवरील अत्याचाराच्या रावणाचा कायद्याच्या वापराने वध करूया, असे त्या म्हणाल्या.

महिलांच्या संरक्षणासाठी कायद्याचे कवच

अश्विनी धन्नावत यांनी आपल्या भाषणात विशेषतः महिलांच्या सुरक्षेवर भर दिला. त्यांनी म्हटले की, भारतीय कायद्याने महिलांना जन्मापूर्वीपासून ते मृत्यूपर्यंत प्रत्येक टप्प्यावर संरक्षण दिले आहे.

- जन्मापूर्वी संरक्षण: गर्भात असतानाच मुलींचे संरक्षण व्हावे यासाठी 'गर्भलिंग चिकित्सा प्रतिबंधक कायदा' अत्यंत महत्त्वाचा आहे. या कायद्यानुसार, गर्भातील लिंग तपासणी करणे आणि त्यासाठी मदत करणे हा दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे.
- बालपणात संरक्षण: बालविवाहांना आळा घालण्यासाठी 'बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६' अस्तित्वात आहे. या कायद्यानुसार, १८ वर्षांखालील मुलींचा विवाह करणे हा गुन्हा आहे.
- शिक्षण आणि समान संधी: शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक मुलीला शिक्षणाचा अधिकार आहे आणि 'समान वेतन कायदा, १९७६' नुसार समान कामासाठी पुरुषांइतकेच वेतन मिळण्याचा तिला हक्क आहे.
- विवाह आणि कौटुंबिक जीवन:
  - 'हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१' नुसार हुंडा देणे किंवा घेणे हा गंभीर गुन्हा आहे.
  - 'कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५' महिलांना घरात होणाऱ्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि आर्थिक छळापासून संरक्षण देतो.
  - 'हिंदू उत्तराधिकार कायदा, २००५' नुसार वडिलांच्या मालमत्तेवर मुलींना मुलांइतकाच समान हक्क आहे.
- कामाच्या ठिकाणी सुरक्षा: कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ होऊ नये यासाठी 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा, २०१३' लागू करण्यात आला आहे.
- आरोग्य आणि मातृत्व:
  - 'मातृत्व लाभ कायदा, १९६१' नुसार नोकरी करणाऱ्या महिलांना प्रसूतीसाठी भरपगारी रजा मिळण्याचा अधिकार आहे.
  - 'मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी क्ट' अंतर्गत महिलेला गर्भपाताचा अधिकार देण्यात आला आहे, मग ती विवाहित असो वा अविवाहित.
- ज्येष्ठ नागरिक म्हणून संरक्षण: ज्येष्ठ नागरिकांच्या देखभालीसाठी आणि कल्याणासाठी विशेष कायदे आहेत, जे वृद्ध महिलांना आधार देतात.

कायद्याचे ज्ञान हीच खरी शक्ती आहे. प्रत्येक नागरिकाने, विशेषतः महिलांनी, आपल्या हक्कांसाठी आणि संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांची माहिती करून घेतली पाहिजे. जेव्हा प्रत्येकजण कायद्याचे पालन करेल आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असलेल्या राज्याची स्थापना होईल, असे आवाहन करत ड .अश्विनी धन्नावत यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.यावेळी महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष एडवोकेट अनुप धन्नवत , मुंबई प्रदेश अध्यक्ष ड.राहुल अग्रवाल, इत्यादी उपस्थित होते.

# संक्षिप्त

## जालना माहेश्वरी समाजाचे गुरुवारी दिपावली अन्नकुट आणि स्नेहमिलन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** जालना माहेश्वरी समाजाचे दिपावली अन्नकुट व स्नेहमिलन गुरुवार दि. २३ ऑक्टोबर रोजी ज्वॉला लॉन येथे सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आले आहे.

याप्रसंगी प्रसिद्ध वक्ते आणि उद्योगपती संजय मालपाणी, संगमनेर यांचे व्याख्यान होणार होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्रदेशाध्यक्ष श्रीकिशन भंसाली जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांची उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी या वर्षीचा माहेश्वरी समाजाचा जीवन गौरव हा सन्मान सेवानिवृत्त शिक्षक ताराचंद मालपाणी यांना प्रदान करण्यात येणार आहे. तत्पूर्वी सकाळी १० ते १२ या वेळेत गुणवंत विद्यार्थी व विशेष पदाधिकार्यांचा सत्कार महेश भवन येथे करण्यात येणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ऑयकान स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक दिनेश राठी व स्टेट टॅक्स इन्स्पेक्टर स्वप्नील इंदाणी हे उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास समाज बांधवानी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी, सचिव उमेश बजाज, ओमप्रकाश मंत्री, संजय दाड, विजय राठी, कांतीलाल राठी, सत्यनारायण सारडा, दामोधर बजाज, शिवरतन मुंदडा, पुसारामजी मुंदडा, अतुल लड्डा, राजेंद्र मंत्री, विनोद बियाणी, सुनिल बियाणी, अमोल बांगड, सुधिर मंत्री, सतिष राठी, आर. आर. मंत्री, महेश सारडा, शिवाभाऊ गट्टाणी, जुगलकिशोर होलाणी, पुरुषोत्तम मुंदडा, शामसुंदर लखोटिया, प्रा. स्वप्नील सारडा, डॉ. आशुतोष सोनी, संतोष सारडा, शैलेश मुंदडा यांनी केले आहे.

## गुणवान आणि चारित्र्यवान चिकित्सकांचे निर्माण हा धन्वंतरी जयंतीचा

**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर (प्रतिनिधी)** भारत आरोग्य संगठनाने भगवान धन्वंतरी जयंतीच्या निमित्ताने 'धन्वंतरी पुरस्कार सोहळा' १८ ऑक्टोबर रोजी यशस्वीपणे आयोजित केला.यावेळी भारत आरोग्य संगठनाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अरुण खैरे यांनी सांगितले की, संस्थेची आजीवन सदस्यता किंवा सेमिनार, वर्कशॉप इत्यादी सर्व प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेतले जात नाही आणि या संस्थेचा मुख्य उद्देश शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देणे तसेच आरोग्यासंबंधित ज्ञान जनतेपर्यंत पोहोचवणे हा आहे. कार्यक्रमात डॉ.सुमित श्रीवास्तव आणि डॉ. आदित्यकांत मिश्रा यांना वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी सन्मानित करण्यात आले.

लखनऊ येथील महेश्वर आयुर्वेद केंद्रावर आयोजित कार्यक्रम धन्वंतरी पूजा आणि प्रसाद वितरणासह संपन्न झाला, ज्यात राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. अजय सिंह,सचिव डॉ. अरविंद गुप्ता, राष्ट्रीय प्रमुख डॉ. स्वप्निल कैथवास, महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.नितिन वळवी, उपाध्यक्ष डॉ. केतन दांगट, सचिव डॉ.अनूप थूटे,वित्त प्रमुख डॉ. वैशाली गुप्ता आणि महिला शाखा प्रमुख प्रो.आरती सिंह, डॉ. रजनीश कसोधन, डॉ. श्वेता खैरे व डॉ. विभा राणी रत्ना यांचा सक्रिय सहकार्य लाभला.

## आचार्य प्रणामसागरजी महाराज यांच्या हर घर भक्तांबर पदयात्रेस प्रारंभ

**अंतर्मना आचार्य प्रसन्नसागरजी महाराज रचित अंतर्मना उवाच पुस्तक भेट**



**आत्ताच एक्सप्रेस**

**संभाजीनगर /प्रतिनिधी /** श्री.१००८ खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पाश्र्वनाथ मंदिर राजाबजार येथे आचार्य प्रणामसागरजी महाराज यांचा चातुर्मास सुरै असुन आचार्यश्रीच्या सानिध्यात सकाळी शांतीनाथांचा पंचामृत अभिषेक व शांतीधारा संपुर्ण आचार्यश्रींचे हर घर भक्तांबर पदयात्रेस प्रारंभ करण्यात आले. हि पदयात्रा चौराहा, राजाबजार, जाफरगेट मार्गाने रोकडा हनुमान कॉलनी येथे विसर्जीत करण्यात आली. यावेळी पदयात्रेत भाविकांनी आचार्यश्रींचे दुध व पाण्याने पादपक्षालन केले व पुष्पवृष्टी करण्यात आली. पदयात्रेत जाफर गेट येथे प्रसन्न आराधना येथे आचार्य प्रसन्नसागरजी महाराज लिखीत अंतर्मना उवाच हे पुस्तक पियुष कासलीवाल परिवारा तर्फे भेट देण्यात आले.

यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी सचिव प्रकाश अजमेरा , प्रमोद पांडे, प्रकाश कासलीवाल, नरेद्र अजमेरा, सनदकुमार साहुजी, पियुष कासलीवाल, अनिल कासलीवाल,सगिता कासलीवाल संजय मुथा, चंदा कासलीवाल, किर्ती कासलीवाल, कीरन गगवाल नयना अजमेरा, मौलीक कासलीवाल , पंकज पाटणी, कल्याणी पाटणी, महावीर ठोले, राजकुमार पांडे, जिवन पाटणी, प्रेमचंद पाटणी,योगेश गंगवाल,प्रिती गंगवाल,सपना छाबडा,शोभा ठोले,भरत ठोले,स्नेहल ठोले चंद्रकुमार पाटनी ,विनोद जाजु, रयनमंजुषा साहुजी, यांच्यासह समाज बांधवांची मोठया संख्येने उपस्थिती होती तदनंतर रोकडा हनुमान कॉलनी येथील प्रमोद पांडे यांच्या निवासस्थानी आचार्यश्रींचे आहारचर्या होउैन संध्याकाळी आनंदयात्रा होउैन सायंकाळी आरतीने कार्यकमाची सांगता करण्यात आली. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813